International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# महात्मा फुले यांचे शेती सुधारणा विषयक विचार आणि सध्यकालीन शेतीसमस्या व राजकारण

**अशोक दिलीप जायभाये**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, डॉ. रफिक झकारिया महाविद्यालय, औरंगाबाद
**Corresponding Author – अशोक दिलीप जायभाये**
**Email:** ashokdj141194@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10057851**

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. थोडक्यात काय भारतातील बहुसंख्य लोक उदरनिर्वाहासाठी कृषी व सलंग्नित क्षेत्रावर अवलंबून आहेत. परंतु त्या बहुसंख्य लोकांचा व्यवसाय असणाऱ्या क्षेत्राची स्थिती आज दयनीय का झाली आहे. हा विचार करायला भाग पाडणारा प्रश्न आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर म्हणजे 1950 च्या दशकामध्ये भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पनामध्ये (GDP) कृषिक्षेत्राचा वाटा 50% इतका होता. व उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्यो अंदाजे 65-70 % एवढी होती. परंतु पुढे ही संख्या कमी-अधिक प्रमाणात स्थिर राहिल्याची आपणांस दिसून येते. परंतु याविपरीत कृषी क्षेत्राचा (GDP) मधील वाटा सातत्याने घटल्याचे दिसून येते. व त्याची जागा सेवा व उद्योग क्षेत्राने घेतल्याचे दिसते. म्हणजे शेतीवरील अवलंबित्व कमी झालेले नसून मात्र देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामधील प्रमाण झपाट्याने कमी झाले आहे.[1] 1991 च्या नवीन आर्थिक धोरणांचा असंघटित शेती व्यवसाय क्षेत्रावर वाईट परिणाम पडल्याचे दिसून येते. या काळात कृषी व संलग्नित क्षेत्राचा (GDP) मधील वाटा 35% पर्यंत कमी झाला आणि आज 2023-24 मध्ये तो Press Information Beauro (PIB) च्या आकडेवारी नुसार 18.3% इतका कमी झाल्याचे दिसून येते.[2] या घटना पाहता 19 व्या शतकामध्ये महात्मा ज्योतिबा फुलेंनी शेतीअधुनीकरण विषयी जे विचार सांगितले ते आज राबवले जात आहेत. तरीही शेतीसमोरील संकटे व शेतकरी आत्महत्या हा प्रश्न सुटलेला दिसून येत नाही.

**कि शब्द –** शेतकरी, कृषिसंकट, महात्मा फुले, राजकारण

**संशोधन पध्दती –** संबंधित संशोधनाकरिता दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

**महात्मा फुलेचे शेती-सुधारक विषयक विचार :**

महामा फुलेंनी शेती संबंधीत जे लिखाण केले आहे. ते सर्व अनुभवजन्य आहे. ते स्वत: शेतकरी होते. शेतात राबत असताना येणाऱ्या अडचणी व ब्रिटिश सरकारकडून शेतकऱ्यांना मिळवणारी वागणूक त्याचबरोबर शेतकऱ्यांचा अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार व भटांकडून त्यांची होणारी छळवणूक या सर्वांचा परिपाक म्हणजे महात्मा फुलेंचे शेतकऱ्यांचा असूड हे पुस्तक आहे.[3]

**महात्मा फुले यांच्या शेतीसुधारणा विषयक उपाययोजना :**

1. शेतकऱ्यांना शेतीविषयक प्रगत तंत्रज्ञान माहिती व्हावे म्हणून प्रगत देशामध्ये कृषीविषयक जी नियतकालिके व इतर माहिती प्रकाशित होते ती भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, आणि शेतकऱ्यांना या सर्वांची माहिती करुन देण्यासाठी रात्रीच्या शाळा उघडण्यात याव्यात. असे मत त्यांनी व्यक्त केले.
2. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक आधुनिक शिक्षण-प्रशिक्षण देऊन इतर प्रगत देशाच्या शेतीचा विकास त्यांना दाखविला पाहिजे. शेतसाऱ्यांपासून सरकारला जे उत्पन्न मिळते. ते शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावे. शेतकऱ्यांमध्ये पिकस्पर्धा आयोजित करुन जास्त उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे सरकारने दयावे.

3. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते शेतकऱ्यांनी लहान बंधारे व नाले तयार करुन जमिनीत मुरवले पाहिजे.
4. शेतकऱ्यांनी अधुनिक पिकपध्दतीचा अवलंब करुन उत्पादन वाढवले पाहिजे. त्यांचबरोबर शेतीवर आधारित उदयोगधंदे शेतकऱ्यांनी सुरु केली पाहिजेत असे महात्मा फुले नमूद करतात.
5. त्याचबरोबर अतिशय अत्यल्प दराने शेतकऱ्यांना कृषीकर्जपुरवठा करणे, जंगली जनावारांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना बदुंकीचे परवाने दयावे असे ब्रिटिश सरकारला सांगतात.
6. शेतकऱ्यांनी स्वत:च्या आर्थिक प्रगतीसाठी अंधश्रध्दा, कर्मकांड व भटा-ब्राम्हणांकडून पसरवण्यात आलेल्या भ्रामक समजुती पासून दूर जाऊन शिक्षित व्हावे असा बहुमोलाचा सल्लाही फुले शेतकऱ्यांना देत असण्याचे निदर्शनास येते.
7. कृषीप्रदर्शन भरुन जनजागृती करावी व आधुनिक पध्दतीने पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने बक्षिसे दयावी.[4]

**फुलेकालीन शेतकऱ्यांची स्थिती व समस्या :**

महात्मा फुलेचा काळ म्हणजे स्वातंत्र्यापूर्वीचा काळ होय. या काळात भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा अंकित झालेला होता. ब्रिटिशांनी शेती महसूलात अतिरिक्त वाढ केली होती. महालवारी, रयतवारी, व कायमधारा अशा जाचक शेतसारा वसुलीच्या पध्दती शेतकऱ्यांवर लादल्या होत्या. उत्पादित केलेल्या सर्व शेतमालाची विक्री करुन सुध्दा शेतकऱ्यांना शेतसारा भरणे अशक्य होऊ लागले त्यातच सततचे दुष्काळ साथीचे रोग, वाढती महागई यामुळे शेतकऱ्यांना जीवन जगणे कठीण होऊन बसले. 1871 मध्ये ज्वारीच्या एका पोत्याची किंमत 3 रुपये एवढी होती. परंतु 1874 मध्ये तिच किंमत सव्वा रुपये पोती एवढी कमी झाली परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली या परिस्थितीतही शासनाने शेतसारा कमी केला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना आपली जमीन स्थावर मालमत्ता व गुरे, ढोरे विकणे भाग पडले. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या अडाणीपणा व देवभोळेपणा हाही शेतकऱ्यांना प्रगतीला मारक ठरल्याचे महात्मा फुले सांगतात.

शेतकरी रुढी व परंपरामुळे काही धार्मिक विधी किंवा लग्न, तेरवी, दहावा, बारसे यांवर वाजवीपेक्षा जास्त पैसा खर्च करत असे प्रसंगी कित्येक शेतकऱ्यांनी या कार्यासाठी जमिनी विकल्या किंवा खाजगी सावकारांकडून अवाच्या-सव्वा दराने कर्जे घेतली ते फेडू न शकल्याने त्यांच्या जमिनी या सावकारांने बळकवल्या व त्याच शेतावर या शेतकऱ्यांना वेठबिगार म्हणून काम करावे लागले प्रसंगी या सर्व परिस्थितीचा भटांनी फायदाच घेतल्याचे निदर्शास येते. सततच्या दुष्काळामुळे व साथीच्या रोगामुळे त्याकाळी मोठ्या प्रमाणावर गुरे दगावत असत. व राहिलेल्या गुरांना जंगल खात्याच्या जाचक अटीमुळे चरायला जागा उपलब्ध होत नसल्यामुळे विकावी लागत परिणामी बैलाअभावी बागायती पिके शेतकरी घेऊ शकत नव्हता त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत होते.[5] अशा प्रकारे स्वातंत्र्यापूर्वी फुले कालखंडामध्ये शेतकऱ्यांची स्थिती होती.

**सध्यकालीन शेतीसमस्या व राजकारण:**

ब्रिटिश काळापासून शेतीव्यवसायासमोरील ज्या समस्या होत्या त्य आजही थोडयाफार फरकाने अस्तित्वात आहेत. फक्त फरक एकच आहे की, ब्रिटिश सत्ताधीश गेले आणि भारतीय सत्तेवर आले. स्वातंत्र्योत्तर प्रामुख्याने कामगारांचे लढे या देशाने अनुभवले त्यावर डाव्यांचे वर्चस्व होते. पण त्यांनी एकही लढा शेतकऱ्यांसाठी उभारला नाही. स्वातंत्र्यपूर्वी शेतकऱ्यांकरिता महात्मा फुले, वल्लभाई पटेल व त्यानंतर महात्मा गांधीनी कार्य केले होते.

स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक बाजू भक्कमपणे पहिल्यांदा अगदी पुराव्यानिधी कोणी मांडली असेल तर ती शरद जोशी यांनी "भीक नको हवे घामाचे दाम" अशी गर्जना त्यांना केली होती. शेती उत्पादनाचे मुल्य सरकार ठरवत असे याला शरद जोशी यांनी तीव्र विरोध केला व उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव त्याचबरोबर हे ठरवण्याचे अधिकार शेतकरी प्रतिनिधींना असायला हवेत अशी मागणी प्रथमच: शरद जोशींनी केली.[6] महाराष्ट्र स्थापनेनंतर महाराष्ट्र राज्याचे प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी काही महत्वाचे कायदे केले ते खालीलप्रमाणे :

1) **तुकडाबंदी कायदा :** 1947 च्या मुंबई तुकडेबंदी-तुकडेजोडे कायद्याची व्यापक पध्दतीने अमंलबजावणी यशवंतरावांच्या काळात झाली. यामुळे जमीनधारण क्षेत्र सलग होण्यास खूप मदत आली.

2) **कुळ कायदा :** 1955 या वर्षी भाऊसाहेब हिरे महसूलमंत्री यांनी असताना हा कायदा झाला. परंतु यांची कठोर अमलंबजावणी यशवंतराव चव्हाण साहेबांनी केली व 'कसेल त्याची जमीन' हे तत्व लागू करुन जमीन मालकीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात क्रांती घडवून आणली.

3) **कमाल जमीन धारणा कायदा :** 1961 साली या कायद्याने जमीन धारणेवर कमालमर्यादा घालण्याची व जास्तीची जमीन भुमीहीन मजुराला वाटून देण्यात आली. 1960-61 साली 50,000 लोकांना कसण्याकरिता जमिन वाटून देण्यात आली.

या नंतर च्या काळात वसंतराव नाईकांनी आपल्या 11 वर्ष 78 दिवसांच्या प्रदिर्घ मुख्यमंत्री कार्यकाळात कृषीक्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले. हरितक्रांतीचा पुरस्कार त्यांनी केला. तरीही शेतकऱ्यांपुढील काही प्रमुख समस्या कायम राहिल्याचे दिसून येते. यानंतरच्या काळामध्ये ही शेतकरी हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदूच होता. परंतू सत्तासंघर्षाच्या आणि हितसंबंधाच्या राजकारणात शेतकऱ्यांच्या हिताकडे कानाडोळा झाला. सध्यकाळामध्ये महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी वेगवेगळया योजना राबवत असल्याचे आपल्या निर्देशनास येते. त्यामध्ये जलसंधारणसाठीची पाणी अडवा पाणी जिरवा, मागेल त्याला शेततळे, ठिंबक व तुषार सिंचन योजना, सौरपंप, शेतीसाठी आवश्यक यंत्रणावर सबसिडी, दुधाळ गाय-म्हैस वाटप, शेळी गट वाटप इ. सारख्या सरकारी अनुदानीत योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहेत. परंतु तरीही शासकीय आकडेवारी नुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्याचा आलेख सातत्याने वाढत असतांना दिसून येतो.[7]

**समारोप :**

गेले काही वर्षे महाराष्ट्राचेच नाही तर देशाचेही राजकारक शेतकऱ्यांभोवती फिरते आहे. कोट्यावधीची पॅकेजेस दिली, कर्जमाफी दिली तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. राजकारण्याच्या केंद्रस्थानी शेतकरी असलातरी शेतकऱ्यांचे जगणे सुसह्य व्हावे आणि त्यांच्या जगण्याचा स्थर उचंवावा. यासाठी ठोस व गंभीर प्रयत्न अपवादानेच दिसतात. परिणामी शेतकरी फक्त साहनभुतीपुरताच उरतो. आणि त्यांचे प्रश्न जसेच्यातसे ठेवणे राजकारणाची गरज बनते.

कर्जमाफी हा काय शेती समस्यापुढील पर्याय नाही. त्याऐवजी शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची गरजच लागू नये. ऐवढे सक्षम शेतकऱ्यांना बनवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला हमीभाव देत असतांना त्या शेतीमध्ये राबणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या मेहनीचा विचार व्हावा. शेतीसाठी राबणाऱ्या आणि ओढकामासाठी आवश्यक असणाऱ्या बैलांचा खर्च व त्या शेतीचे भाडे या सर्वांचा विचार करुन शेतकऱ्यांच्या मालाची किंमत ठरवली जावी. त्याचबरोबर शेतीकडे व्यवसायाच्या दृष्टीकोनातून पाहिले जावे. त्याचबरोबर महात्मा फुलेंच्या शेती आधुनिकीकरणाच्या उपाययोजना वर शेतकरी व सरकारकडून अमंलबजावणी व्हावी.

**शिफारशी :**

1. सिंचनक्षेत्र वाढवण्यासाठी Fast Track Action Plan तयार करणे गरजेचे आहे.
2. 12-18 तास विजेचे भारनियमन थांबवून शेतकऱ्यांना 24 तास परवडणाऱ्या दरामध्ये वीज द्यावी आणि वीज नसलेल्या ठिकाणी सवलतीच्या दरामध्ये सौरउर्जेवरील कृषीपंप दिले जावेत.
3. घरबांधण्यासाठी व वाहन घेण्यासाठी जेवढ्या तत्परतेने बँका कर्ज देतात त्याच तत्परतेने व अत्यल्प दरात शेतीसाठी कर्जपुरवठा झाला पाहिजे.
4. शासकिय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यामध्ये ज्याप्रमाणे नियमितपणे वाढ होते. तशी शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या किमतीमध्ये व हमीभावामध्ये महागाई निर्देशांकानुसार वाढ व्हावी.
5. सरकारने शेतकऱ्यांसाठी सुरु केलेल्या योजनांची परिपूर्ण माहिती प्रत्येक गावी ग्रामपंचायती समोर दर्शनी भागात लावणे सरपंचावर बंधनकारक करण्यात यावे.

**संदर्भसूची :**


1. Department of Agriculture Co-operation & Farmers Welfare "Annual Report" (2022-2023).
2. https://www.pib.gov.in/pressReleasepage.aspx?PRID=1909213
3. नरके हरी, संपा. (2021) महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई समितीची दुसरी आवृत्ती पृ. क्र. 255-343
4. शेतक–याचा आसूड महात्मा फुले लिखित मुळ ग्रंथ.

5. जोगदंड बबन ,(2022) कृषी संवादक महात्मा फुले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई.
6. मांडवकर पवन, (2016) शरद जोशी, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र , कळंब, प्रथम आवृत्ती.
7. लांजेकर नरेंद्र, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, चिंतन आणि उपाय, सुमेरु प्रकाशन डोंबिवली प्रथम आवृत्ती.